जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेचे भूमिपूजन करताना हेमकिरण व डॉ. राम पणदूरकर, सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

# डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका

## मातापित्यांकडून ३५ लाखांची देणगी; विद्यापीठ आवारात भूमिपूजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या नावे ३५ लाखांच्या देणगीतून स्वतंत्र अभ्यासिका बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन मंगळवारी झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह पणदूरकर दांपत्य व त्यांचे नातेवाईक, मित्र परिवार उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका नव्हती. वसतिगृहामध्ये त्यांना विहीत वेळेत परत येणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन 'कमवा व शिका' वसतिगृहाच्या सुरक्षित परिसरात साकारत असलेल्या अभ्यासिकेमुळे विद्यार्थिनींची मोठी सोय होणार आहे.

डॉ. पणदूरकर यांनी रूपाली पणदूरकर यांचा स्मृतिदिन १५ सप्टेंबर असून त्या दिवशी अभ्यासिकेचे उद्घाटन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. सुरुवातीला पणदूरकर दांपत्याच्या हस्ते भूमिपूजन झाले. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेल्या ३५ लाखांच्या रकमेतून कन्या डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात साकारत असणारी विद्यार्थिनींसाठीची अभ्यासिका त्यांची विद्यापीठास अमूल्य भेट आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले. सहा महिन्यांत इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. संभाजी शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2024
तरुण भारत



कोल्हापूर : येथे ॲड. रुपाली पणदूरकर स्मृती अभ्यासिकेचे भूमिपूजन करताना हेमकिरण पणदूरकर, डॉ. राम पणदूरकर. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# ॲड. रूपाली पणदूरकर स्मृती विद्यार्थिनी अभ्यासिकेचे भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. राम पणदूरकर व सौ. हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून ३५ लाखांची देणगी कन्या ॲड. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाला दिली आहे. या देणगीतून साकारण्यात येणाऱ्या विद्यार्थिनीं अभ्यासिकेचे भूमिपूजन पणदूरकर दांपत्यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका नव्हती. परिसरात साकारत असलेल्या अभ्यासिकेमुळे विद्यार्थिनींची सोय होणार आहे. सहा महिन्यांत या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कारण डॉ. पणदूरकर यांनी रुपाली पणदूरकर यांचा स्मृतिदिन १५ सप्टेंबर असून त्या दिवशी अभ्यासिकेचे उद्घाटन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. गिरीश कुलकर्णी, रमेश पोवार, रणजीत यादव, विजय पोवार, अमित कांबळे, शिवकुमार ध्याडे, जी.बी. मस्ती, वैभव आरडेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2024
पुढारी

# 'शिवराज'मध्ये आज, उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

**गडहिंग्लज :** येथील शिवराज विद्या संकुल व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ व १६ फेब्रुवारी रोजी 'कॉम्प्युटर सायन्स व इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. संस्थाध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे अध्यक्षस्थानी असतील. शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सचिव डॉ. अनिल कुराडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. राणी चन्नम्मा बेळगाव विद्यापीठाचे डॉ. एस. एस. गोरनाले, शिवाजी विद्यापीठाचे कॉम्प्युटर सायन्स विभागाचे डॉ. के. जी. खराडे, के. आर. पी. कन्या कॉलेज इस्लामपूरचे डॉ. डी. आर. पाटील, गव्हर्न्मेंट कॉलेज आणि पी. जी. सेंटर धारवाडचे एस. एस. माणगावे यांचे मार्गदर्शन होणार आहे. कॉम्प्युटर ग्राफिक्स, डाटा मायनिंग, क्लाऊड नेटवर्क, सायबर सिक्युरिटी, बायोमेडिकल इन्फॉर्मेशन, डिजिटल मार्केटिंग, सिमेंटिंग सोशल आणि वेब सेन्सर, इंटरनेट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशिन लर्निंग, अल्गोरिदम यासह कॉम्प्युटरच्या अन्य विषयांवर संशोधनपर लेख प्रकाशित करण्यात येणार आहेत. यावेळी पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन सत्र होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2024
Times of India

# 'Uniformity in charging devices needed to reduce e-waste'

TIMES NEWS NETWORK

Kolhapur: As per the United Nations (UN) environment report, e-waste worth $62.5 billion is generated worldwide every year. Hence, there are many opportunities for setting up businesses in the field of e-waste management currently. Researchers should come forward to clean the environment, asserted Dr Rania Lampau, the education advisor to the Ministry of Greece.

Lampau was speaking at the three-day international webinar on Electronic Waste and Sustainable Development organised at the electronics department of Shivaji University, Kolhapur (SUK). He said, "There is also a need to bring uniformity in charging devices to reduce the amount of e-waste. With that in mind, the European Union has made it mandatory to provide type-c ports for charging all electronic devices by the end of 2024. Laptops will also be equipped with USB type-c by April 2026."

Meanwhile, SUK has recently started an e-waste management centre at the electronics department on February 12. SUK vice-chancellor Dr Digambar Shirke said, "Mismanagement of e-waste is a global problem. To solve it, comprehensive research should be done, along with solid policies. An additional tax should be collected from those generating solid waste and e-waste and handed to the local bodies."

"Today, telephone, computer and mobile sets are generating e-waste in large amounts. Sorting the e-waste and reusing the useful parts by making required changes has become necessary. Everyone should take care at their level to avoid the generation of electronic waste. Also, the e-waste needs to be properly managed. Shivaji University's centre for e-waste management is very important in that regard," added Shirke.

15 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसतिगृह, संशोधन सुविधांना प्राधान्य

## विद्यापीठाच्या ६०१ कोटींच्या अंदाजपत्रकाला सिनेटची मंजुरी; नावीन्यपूर्ण योजनांचा सदस्यांकडून आग्रह

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. १४ : गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा शिवाजी विद्यापीठाचे अंदाजपत्रक (बजेट) ६३ कोटी ४३ लाखांनी वाढले आहे. त्यामध्ये वसतिगृह, परदेशी विद्यार्थ्यांसाठी सुविधा, नवीन सौर यंत्रणा, सुशोभीकरण, नवीन हॉल अशा पायाभूत आणि संशोधनविषयक सुविधांना प्राधान्य आहे. अधिसभेने (सिनेट) सन २०२४-२५ साठीचे ६०१ कोटी ७२ लाख रुपयांचे अंदाजपत्रक आज मंजूर केले. त्यात विद्यापीठाने पाच नव्या तरतुदींचा समावेश केला आहे.


अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी मांडलेल्या या अंदाजपत्रकावर अभिषेक मिठारी, संजय परमाणे, सारंग कोल्हापुरे, विष्णू खाडे, श्वेता परुळेकर, मनोज गुजर आदींनी विविध सूचना केल्या. त्यांनी तरतुदींबाबत तोचतोचपणा टाळून नावीन्यपूर्ण योजनांचा समावेश करण्याची आग्रही मागणी केली. त्यावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ढमकले यांनी स्पष्टीकरण दिले. सभागृहात पाऊण तासाच्या चर्चेनंतर सदस्यांनी अंदाजपत्रक मंजूर केले. त्यात ५९६ कोटी २९ लाख रुपये अपेक्षित जमा आहे. ५ कोटी ४२ लाख रुपये इतकी तूट असून, विद्यापीठ फंडातील शिल्लक रकमेमधून ती भरून काढली जाणार आहे. विद्यार्थिनी, विद्यार्थी, वसतिगृह व शिक्षक, क्रीडा अधिविभाग या वसतिगृहातील सुविधा, रस्ते, संरक्षक भिंत, आदी पायाभूत सुविधांसाठी सुमारे १९ कोटींची, तर शैक्षणिक, संशोधन, संगणक प्रणालीसाठी पाच कोटींची तरतूद केली आहे.

### नव्या तरतुदी

- अतिथीगृह बांधण्यासाठी : ७० लाख
- संख्याशास्त्र विभागातील नव्या हॉलसाठी : ५३ लाख
- क्रीडा विभागाअंतर्गत नेटबॉलसाठी : ३ लाख
- सिटी चॅप्टर ॲल्युमिनी मीटसाठी : ५ लाख
- जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्रासाठी : २ लाख ३० हजार

### निलंबन लेख्यांतून ३०२ कोटी जमा

- या अंदाजपत्रकात निलंबन लेख्यांमधून ३०२ कोटी ४ लाख रुपये जमा होणार आहेत. त्यातून २६४ कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.




### नवीन रस्त्यांसाठी संशोधन निधीतून तरतूद

- विद्यापीठ परिसरात नवीन रस्ते करण्यासाठी संशोधन व विकास निधीतून एक कोटी ७५ लाखांची तरतूद केली आहे. त्यावर ही बाब धक्कादायक असून, संशोधन, शैक्षणिक उपक्रमांसाठी निधी वाढविण्याची मागणी अभिषेक मिठारी यांनी केली. भविष्यातील आव्हाने न पेलणारा अर्थसंकल्प असे मतही व्यक्त केले.

### 'बजेटमध्ये तोचतोचपणा, आकडे फुगविले'

- या बजेटमध्ये खर्चाचे आकडे फुगविल्यासारखे वाटत असल्याचे संजय परमाणे यांनी, तर मनोज गुजर यांनी तरतुदींमध्ये गेल्या काही वर्षांप्रमाणे तोचतोचपणा असल्याचे सांगितले. संशोधनाला चालना देण्याची मागणी विष्णू खाडे यांनी केली. बजेटची प्रत वेळेत मिळाली नसल्याची तक्रार श्वेता परुळेकर यांनी केली.

### 'समतोल साधून नवे प्रकल्प हाती'

- समितीच्या माध्यमातून विद्यापीठ घटकांची मते जाणून घेऊन अंदाजपत्रक तयार केले आहे. विद्यार्थ्यांबाबत काही कमी केलेले नाही. संशोधनाला चालना दिली आहे. समतोल साधून नवे प्रकल्प हाती घेतले असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. शासकीय नियमांच्या चौकटीत अर्थसंकल्प मांडला असल्याचे डॉ. ढमकले यांनी सांगितले.

15 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पायाभूत सुविधा, शैक्षणिक उपक्रमांना चालना

## शिवाजी विद्यापीठाच्या ६०१ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला अधिसभेत मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठअंतर्गत पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कलागुणांना वाव देणाऱ्या सन २०२४-२५ च्या वार्षिक अंदाजपत्रकाला विद्यापीठाच्या अधिसभेत मान्यता देण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. अपेक्षित जमा ५९६.२९ कोटी रुपये असून, अपेक्षित खर्च ६०१.७२ कोटी रुपये आहे. अंदाजपत्रकीय तूट ५.४२ कोटी रुपये असून, ही तूट निधीतील शिलकेतून भरून काढण्यात येणार आहे.



प्रा. रघुनाथ ढमकले यांनी अंदाजपत्रक सादर केले. सन २०२४-२५ चे वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्याकरिता विद्यापीठाने विकसित केलेल्या वेबबेस अंदाजपत्रक प्रणालीमध्ये पेपरलेस कामकाज होण्याच्या दृष्टीने सर्व विभाग व अधिविभागांना स्वतंत्र ऑनलाईन लॉगीन उपलब्ध करून देण्यात आले होते.सन २०२४-२५ या वर्षात प्रशासकीय विभागांकडून ४०.८९ कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ५.०७ कोटी, इतर अधिविभागांकडून २.७८ कोटी जमा होण्याची अपेक्षा आहे, तर इतर उपक्रमांमधून ३३.५१ कोटी असे एकूण ८२.२६ कोटी रुपये विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहेत. वेतन अनुदानापोटी शासनाकडून १४२.३० कोटी, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी १०.८४ कोटी रुपये जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ४५.२४ कोटी इतकी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १३.६१ कोटी रुपये जमेकरिता प्रस्तावित केले आहेत. निलंबन लेख्यांमधून ३०२.०४ कोटी रुपये, असे एकूण ५९६.२९ कोटी रुपये जमा होणे अपेक्षित आहे.

**प्रशासनाचा प्रस्तावित खर्च**

प्रशासनावर होणाऱ्या खर्चाअंतर्गत एकूण ५५.०२ कोटी रुपये, शास्त्र अधिविभाग ६.१९ कोटी, इतर अधिविभाग ६.३१ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४९.१२ कोटी रु. विद्यापीठाच्या स्वनिधीमधील ११६.६५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १५७.८२ कोटी, तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी ४.३९ कोटी रुपये, संशोधन व विकास निधी ४५.२४ कोटी व घसारा निधी १३.६१ कोटी निलंबन लेखे २६४ कोटी अशी एकूण ६०१.७२ कोटी खर्चासाठी तरतूद प्रस्तावित आहे.

### अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये

- शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन पुस्तके व जर्नल खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २.६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- विद्यार्थिनी वसतिगृहाकरिता एकूण २.७५ कोटींची तरतूद करण्यात आली असून, त्यामध्ये वसतिगृह दुरुस्ती, मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे.
- विद्यार्थी वसतिगृहाकरिता एकूण २.२७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.
- कमवा व शिका मुलींचे वसतिगृह नव्याने बांधण्यात आले असून, त्यामध्ये सोयी सुविधा व दैनंदिन खर्चाकरिता रु.४३.३२ लाख ची तरतूद करण्यात आली आहे.
- सध्या विद्यापीठात २८ परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या सोयी सुविधकरिता व उपाययोजना करणेकरिता २८.३६ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- विद्यापीठाच्या वतीने विविध स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरे यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारासाठी १० लाखांची तरतूद करण्यात आली आहे.
- शिवाजी विद्यापीठ मेरिट स्कॉलरशिपकरिता ५० लाख रु. तरतूद करण्यात आली आहे.
- दिव्यांगाच्या सुविधांकरिता २.८० कोटी रु. तरतूद करण्यात आली आहे.
- संशोधनाला चालना देण्याकरिता २.२५ लाख रु. इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- विद्यापीठातील खेळाची मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ४२ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे
- इनडोअर स्पोर्टस कॉम्प्लेक्स बांधण्याचे प्रस्तावित असून याकरिता ५० लाख व रेसलिंग कॉम्प्लेक्सकरिता ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे.
- क्रीडा विभाग वसतिगृहाकरिता रु. ३ कोटी तरतूद करण्यात आली आहे.नवीन सौर यंत्रणा बसविणेकरिता रु. ३.५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

### नव्याने केलेल्या तरतुदी

- संख्याशास्त्र अधिविभागामध्ये २५० आसन क्षमता असलेले हॉल बांधणेकरिता ५३ लाख रु. इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- सभेला प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे तसेच सदस्य उपस्थित होते.

15 FEB 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील संशोधन, खेळाला मिळणार चालना

## ६०१ कोटींचे अंदाजपत्रक अधिसभेत मंजूर : ५ कोटींची तूट; भविष्यातील आव्हानांचा विचार नाही - काही सदस्यांची टीका

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनावर अधिक भर दिल्याने संशोधन व क्रीडा क्षेत्रासाठी अधिकच्या तरतुदी केलेले शिवाजी विद्यापीठाचे २०२४-२५ चे ६०१ कोटी ७२ लाख रुपयांचे खर्चाचे व ५ कोटी ४२ लाख रुपयांचे तुटीचे वार्षिक अंदाजपत्रक बुधवारी अधिसभेत (सिनेट) मंजूर करण्यात आले. विद्यार्थी, संशोधक, क्रीडा, निवासव्यवस्था यावर यात भर दिला असला, तरी भविष्यातील आव्हाने विचारात न घेता हे कॉपी पेस्ट अंदाजपत्रक असल्याची टीका काही सदस्यांनी केली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात अधिसभा पार पडली. २०२३-२४ चे सुधारित व २०२४-२५ चे वार्षिक अंदाजपत्रक अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी मांडले. एक ते दीड तासांच्या सभागृहातील चर्चेनंतर या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली. सन २०२४-२०२५ मध्ये ५९६.२१ कोटी रुपये इतकी रक्कम जमा होणे अपेक्षित असून ६०१.७२ कोटी रुपये इतका खर्च होणे अपेक्षित आहे. यात ५.४२ कोटी रुपये इतकी अंदाजपत्रकीय तूट असून ती विद्यापीठ निधीतील शिलकीतून भरून काढण्यात येणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

### नव्याने केलेल्या तरतुदी

अतिथीगृह बांधण्यासाठी पहिल्या टप्प्यामधील कामासाठी ७० लाखांची तरतूद, संख्याशास्त्र अधिविभागामध्ये २५० आसन क्षमता असलेला हॉल बांधण्यासाठी ५३ लाख, क्रीडा विभागाअंतर्गत नेट बॉलसाठी ३ लाख, सिटी चॅंपरसाठी ५ लाख, संख्याशास्त्र अधिविभागाकडील जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्रासाठी २.३० लाख रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकात करण्यात आली.



| तपशील | अपेक्षित जमा | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| प्रशासकीय विभाग | ४०.८९ | ५५.२ |
| शास्त्र अधिविभाग | ५.०७ | ६.१९ |
| इतर अधिविभाग | २.७८ | ६.३१ |
| इतर उपक्रम | ३३.५१ | ४९.१२ |
| वेतन अनुदान | १४२.३० | १५७.८२ |
| विविध संस्थांकडून निधी | १०.८४ | ४.३१ |
| संशोधन व विकास निधी | ४५.२४ | ४५.२४ |
| निलंबन लेखे | ३०२.४ | २६४ कोटी |

(सर्व रक्कम कोटीत)




■ ०३ कोटी
विविध उपकरणे खरेदीसाठी

■ २.६० कोटी
शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाइन पुस्तके व जर्नल्स खरेदीसाठी ग्रंथालय विभाग

■ २.८० कोटी
दिव्यांगांच्या सुविधा

■ २.२५ कोटी
संशोधनाला चालना देण्यासाठी

■ २८.३६ लाख
विद्यापीठात २८ परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांच्या सोयी-सुविधांसाठी

> विद्यापीठाचे अंदाजपत्रक अत्यंत निराशाजनक आहे. भविष्यातील आव्हाने विचारात न घेता अंदाजपत्रक कॉपीपेस्ट आहे की काय, अशी शंका येते. शिक्षण विकासातील अकॅडेमिक बाबींसाठी अत्यंत तुटपुंजी तरतूद आहे. संशोधन विकास निधीतील दीड कोटी रुपये रस्ते बांधकामासाठी तरतूद करणे ही धक्कादायक बाब आहे.
>
> - ॲड. अभिषेक मिठारी, सदस्य अधिसभा, शिवाजी विद्यापीठ.

### हे ठराव केले मंजूर

१. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होईल या अनुषंगाने सर्व महाविद्यालयांमध्ये साजरा होणारा वाचन प्रेरणा दिन व्यापक स्वरुपात साजरा करणे, विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना स्वतःचे स्कील सुधारणा कोर्सेस व ई-कंटेंट मॉकच्या अनुसरून कोर्सेस तयार करण्याची सुविधा विद्यापीठात उपलब्ध करणे, विद्यापीठाकडून मोडी लिपी अभ्यासक्रम प्रमाणपत्र कोर्स ऑनलाइन स्वरुपात सुरु करावा.

२. भारतीय सैन्याच्या अधिकारी पदासाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करणे, विद्यापीठात जलतरण तलाव बांधणे, समाजातील कुटुंब व्यवस्था व लग्न व्यवस्था या प्रश्नासाठी समुपदेशन कोर्स सुरु करणे, परीक्षेवेळी नेमण्यात येणाऱ्या बैठ्या पथकाचा परीक्षा कामकाजाचा खर्च महाविद्यालयांवर निश्चित करणे.

३. विद्यापीठ स्तरावर संरक्षण व पोलिस सेवा यासंबंधीचे मार्गदर्शन केंद्र सुरु करणे हे ठराव अधिसभेत मंजूर करण्यात आले.

15 FEB 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात ६३ कोटी ४३ लाखांनी वाढ

# पायाभूत सुविधा; संशोधनाला चालना देण्यावर भर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेने (सिनेट) बुधवारी २०२४-२५ साठीचे ६०१ कोटी ७२ लाख रूपयांचे अंदाजपत्रक मंजूर केले. अंदाजपत्रकामध्ये पायाभूत सुविधा तसेच संशोधनासाठी आवश्यक सुविधा पुरविण्यावर अधिक भर देण्यात आला आहे. अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी ६०१ कोटी ७२ लाखांचे अंदाजपत्रक मांडले, गतवर्षी पेक्षा यंदाचे अंदाजपत्रक (बजेट) ६३ कोटी ४३ लाखांनी वाढले आहे.

.अंदाजपत्रकावर अभिषेक मिठारी, संजय परमाणे, सारंग कोल्हापूरे, विष्णू खाडे, श्वेता परूळेकर, मनोज गुजर, आर्दीनी विविध सूचना केल्या. या सुचनांबाबतच्या चर्चेनंतर अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले. अंदाजपत्रकात ५९६ कोटी २९ लाख रूपये अपेक्षित जमा आहे. ५ कोटी ४२ लाख रूपये इतकी तूट असून विद्यापीठ फंडातील शिल्लकेमधून ती भरून काढली जाणार आहे.

अंदाजपत्रकावरील चर्चेदरम्यान अभिषेक मिठारी यांनी तोच तोपणा असल्याचे असल्याचे मत मांडले, तसेच संशोधन, शैक्षणिक उपक्रमांसाठी निधी वाढविण्याची मागणी केली. तर बजेटची प्रत वेळेत मिळावी अशी मागणी केली. प्रत वेळेवर मिळाल्यास अभ्यास करून मत मांडता येईल अशी भावना ही श्वेता परूळेकर यांनी व्यक्त केली. तर संजय परमाणे म्हणाले, अनेक आकडे जादा वाटतात, आकडे फुगविल्यासारखे वाटत आहे. मनोज गुजर यांनी ही नव्या तरतुदी दिसत नसल्याची भावना व्यक्त केली.

**अपेक्षित जमा-खर्च (कोटींमध्ये)**

| विभाग | जमा | खर्च |
|---|---|---|
| प्रशासकीय | ४०.८९ | ५५.०२ |
| शास्त्र | ५.०७ | ६.१९ |
| इतर अविविभाग | २.७८ | ६.३१ |
| इतर उपक्रम | ३३.५१ | ४९.१२ |
| वेतन अनुदान | १४२.३० | १५७.८२ |
| विविध संस्था | १०.८४ | ४.३९ |
| संशोधन व विकास निधी | ४५.२४ | ४५.२४ |
| घसारा निधी | १३.६१ | .१३.६१ |

### विद्यार्थी केंद्रीत अंदाजपत्रक

काटकसरीने विद्यापीठाचे कामकाज सुरू आहे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून समितीच्या माध्यमातून विद्यापीठ घटकांची मते जाणून घेवून अंदाजपत्रक तयार केले आहे. संशोधनाला चालना दित अनेक पायाभूत सुविधा निर्माण करण्यत येत आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के



**नव्या तरतूदी**

- -अतिथीगृह बांधण्यासाठी ७० लाख
- -संख्याशास्त्र विभाग नव्या हॉलसाठी ५३ लाख
- -क्रीडा विभागाअंतर्गत नेटबॉलसाठी ३ लाख
- -सिटी चॅप्टर ॲल्युमिनी मीटसाठी ५ लाख
- -जनगणना माहिती संशोधन केंद्रासाठी २.३० लाख

## केवळ चारच प्रश्नांवर चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बुधवारचा अधिसभेचा प्रश्नोत्तराचा तास विविध प्रश्न आणि त्या संदर्भात देण्यात आलेल्या उत्तरांमुळे गाजला. या तासात केवळ चारच प्रश्नांवर चर्चा झाली. डॉ. मनोज गुजर यांनी विविध अधिकार मंडळाच्या बैठकांचे ध्वनीमुद्रण करून उपलब्ध करून देण्याची व्यवस्था आहे का? असा प्रश्न विचारला, या प्रश्नाला उत्तर देताना स्वागत परूळेकर म्हणाले, ध्वनीमुद्रण २०१७ पासून केले जाते, परंतू ते उपलब्ध करून दिले जात नाही. यावर अधिसभेचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, गोपनीयतेमुळे कार्यालयात ध्वनीमुद्रण उपलब्ध करून दिले जाईल. डॉ. मनोज गुजर काही महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाला संलग्न झाली आहेत काय? या प्रश्नाला उत्तर देताना अमरसिंह रजपूत म्हणाले २३ तंत्रज्ञान महाविद्यालयांनी स्वेच्छेने संलग्नता घेतली आहे. डॉ. मनोज गुजर यांनी सांगली व सातारा उपकेंद्राच्या जागेची निश्चित, खर्चाची तरदुतींबाबत प्रश्न विचारला. यावर डॉ. व्ही. एम. पाटील म्हणाले, जागा निश्चित केली असून उपकेंद्रांसाठीच्या २०० कोटींचा प्रस्ताव आठ दिवसात राज्य शासनाला पाठवला जाणार आहे. श्वेता परूळेकर यांनी विद्यापीठाच्या मुद्रणालयातील रोजंदारी कर्मचाऱ्यांची संख्या आणि व वेतनाबाबत प्रश्न विचारला. रोजंदारी २ कर्मचारी असण्याचे सांगण्यात आले. या प्रश्नावर चर्चा सुरू असतानाच प्रश्नोत्तराचा तास संपला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2024
लोकमत

# गौरी कांबळे हिची 'खेलो इंडिया' स्पर्धेसाठी निवड



कोल्हापूर : आसाम येथे होणाऱ्या खेलो इंडिया स्पर्धेत नेमबाजी स्पर्धेसाठी गौरी संदीप कांबळे हिची निवड झाली. ती शिवाजी विद्यापीठाची नेमबाज आहे.

गौरीची निवड हरियाणा येथे झालेल्या आंतरविद्यापीठीय नेमबाजी स्पर्धेतून झाली. तिने दहा मीटर एअर रायफल नेमबाजी स्पर्धेत वैयक्तिक गटात ६१२.७ असे गुण मिळवले. तर सांघिक प्रकारात ज्ञानेश्वरी पाटील, ऐश्वर्या पार यांच्या साथीने १८६७.१ अशा सांघिक प्रकारात गुण मिळवत सहावा क्रमांक पटकाविला. या कामगिरीच्या जोरावर तिची या स्पर्धेसाठी निवड झाली. सध्या ती आंतरराष्ट्रीय नेमबाजी प्रशिक्षिका अनुराधा खुडे व समीर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली निगडेवाडीतील ड्रीम ऑलिम्पियन रायफल व पिस्टल शूटिंग अकॅडमीत सराव करीत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 FEB 2024
तरुण भारत

# आंतरविद्यापीठ नेमबाजीत विद्यापीठ संघाची उत्कृष्ट कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ आसाममध्ये २१ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानेश्वरी पाटीलने (विवेकानंद कॉलेज) १० मीटर एअर रायफल या प्रकारामध्ये कांस्यपदक मिळवले. हे पदक आपल्या नावावर करण्यासाठी ज्ञानेश्वरीने ६५४ पैकी ६३०.३ गुणांची कमाई केली. याचबरोबर पुरुष-महिला मिक्स गटातून स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल्या फिझा देसाई (छत्रपती शहाजी कॉलेज) व श्रेयस उपाध्ये (के. डब्ल्यू. एस. कॉलेज, सांगली) यांच्या जोडीनेही १० मीटर पिस्तल प्रकारात ६०० पैकी ५७२ गुण मिळवत कांस्य पदक पटकावले. या पदकाला गवसणी घालण्यासाठी फिझाने ३०० पैकी २८४ तर श्रेयस उपाध्ये (३०० पैकी २८८ गुण मिळवले.

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथील कुरुक्षेत्र विद्यापीठातील शुटींग रेंजवर ही स्पर्धा झाली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघासह देशातील ७२ विद्यापीठ संघांमधून ३२३ नेमबाजांनी प्रतिनिधीत्व केले. या स्पर्धेच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या आदित्य साळुंखे (कॉमर्स कॉलेज), सुमेध सासने, प्रतीक जोंग (दोघेही लहू बाळा परितेकर महाविद्यालय, पनोरे, ता. पन्हाळा) या तिघांच्या संघाने पाचवा क्रमांक मिळवला. तसेच ज्ञानेश्वरी पाटील, ऐश्वर्या पोवार व गौरी कांबळे (विवेकानंद कॉलेज) या तिघींच्या संघानेही १० मीटर एअर रायफल प्रकारात पाचवा क्रमांक पटकावला. स्पर्धेतील वरील सर्वच यशस्वी नेमबाजांची २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान गुवाहाटी (आसाम) येथे होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड केली आहे.

निवड झालेल्या नेमबाजांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा विभागाचे क्रीडा व शारिरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्यासह संघ प्रशिक्षक डॉ. निलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय) व संघ व्यवस्थापक डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.